# नियमीत दिवाणी दावा क्र.४८४/२०१६ मधील निशाणी ८९ वरील आदेश

(CNR No.MHOS-10000980-2016)

वादीने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.६ यमुनाबाई जनार्धन थोरबोले या मयत झाल्याने त्यांचे विरुध्दचा अपशमचा (abatement) आदेश रद्य करण्याकरिता दाखल केला आहे.

२. वादीचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.६ यमुनाबाई जनार्धन थोरबोले या दि.१३/१२/२०२१ रोजी मयत झाल्या आहेत. वादी हा वयोवृध्द व आजारी असल्यामुळे तो मयत प्रतिवादीचे वारस अभिलेखावर घेण्याची कार्यवाही मुदतीत करु शकला नाही. करिता, मयत प्रतिवादी क्र.६ यमुनाबाई जनार्धन थोरबोले यांचे विरुध्द झालेला अपशमचा आदेश रद्य करण्यात यावा.

३. प्रतिवादी क्र.१ ते ४ तर्फे विधीज्ञांनी अर्जाचे मागील बाजूस म्हणणे देऊन अर्जास विरोध केला आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, अर्ज कायदेशीर नाही. अर्जातील कारण सयुक्तिक नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात यावा व जर न्यायालय अर्ज मंजूर करण्याचे निष्कर्षाप्रत आले, तर अर्ज वादीवर खर्च ठेवून मंजूर करण्यात यावा.

४. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. दोन्ही पक्षांतर्फे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाची पडताळणी केली.

५. अभिलेखावरुन असे दिसून येते की, प्रतिवादी क्र.६ यमुनाबाई जनार्धन थोरबोले या दि.१३/१२/२०२१ रोजी मयत झाल्या आहेत. त्याबाबत नि.क्र.८६ कडे त्यांचे मृत्यू प्रमाणपत्र दाखल करण्यात आले आहे. प्रस्तुतचा अर्ज हा दि.०६/१२/२०२३ रोजी दाखल करण्यात आला आहे. नि.क्र.९१ वरील आदेशान्वये मयत प्रतिवादी क्र.६ यमुनाबाई जनार्धन थोरबोले यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ करण्यात आला आहे.

६. प्रस्तुत दावा हा वाद मिळकतींचे वाटप होऊन कब्जा मिळणेकरिता दाखल करण्यात आला आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.६ यमुनाबाई जनार्धन थोरबोले यांचे मृत्यूनंतर देखील सदरचा दावा त्यांच्या वारसांना चालविण्याचा अधिकार (Right to sue) हा टिकून राहतो. त्यामुळे मयत प्रतिवादी क्र.६ यमुनाबाई जनार्धन थोरबोले यांचे कायदेशीर वारस अभिलेखावर आणण्याची आवश्यक कार्यवाही करणे गरजेचे आहे. त्यांचे अनुपस्थितीत दावा गुणवत्तेवर चालू शकणार नाही. सबब, अपशमचा आदेश रद्य करणे न्यायोचित होईल. करिता, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो :

**आ दे श**

१) अर्ज मंजूर करण्यात येतो.

२) प्रतिवादी क्र.६ यमुनाबाई जनार्धन थोरबोले यांचे विरुध्दचा अपशमचा आदेश रद्य करण्यात येतो.

**सही/-**

दिनांक : ०३/०१/२०२४

**( एच.एम. मोमीन )**
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
वाशी

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment / order are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | --- | A.A. Joshi, Stenographer,<br>(Grade-III) |
| Court | --- | Jt. Civil Judge, J.D., Washi, Tal. Washi,<br>Dist. Osmanabad |
| Date | --- | 03-01-2024 |
| Order signed by the presiding officer on | --- | 03-01-2024 |
| Order uploaded on | --- | 04-01-2024 |